नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १३१ Issue - 131 | वार रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ Blow- Sunday Date 28 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

### धाराशिव, बीडसह उर्वरित भागात बिकट अवस्था

## पाऊस बनलाय वैरी, लातुरात बचाव पथकांना पाचारण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : गेल्या आठवड्याभर पावसाने मराठवाड्याला झोडपल्यानंतर धाराशिव, बीड ,लातूर, हिंगोली, परभणी जिल्ह्यात रात्रभर झालेल्या पावसाने पुन्हा एकदा थैमान घातले आहे . लातूर जिल्ह्यातील जळकोटमधील वेळ सांगवी गावाला पाण्याचा वेढा असून बचाव पथकं बोलवण्यात आली आहेत . परभणीत काल रात्रीपासून बरसत असलेल्या पावसाचा फटका शेत पिकांसह घरांनाही बसलाय . (चरीरींहुरवर ऋश्रेव) शहरातील गाडगेबाबा नगरमध्ये नाल्याचे पाणी थेट घरात शिरले आहे .अनेक घरांमध्ये गुडघाभर पाणी पाहायला मिळत आहे .अनेकांच्या संसाराची वाताहात झाली आहे . हिंगोलीत कयाधू नदीला पूर आला आहे . या पुरामुळे नदीकाठची शेकडो एकर जमीन पूर्णतः पाण्याखाली गेली आहे .गावात पाणी शिरल्याने दाणादाण उडाली आहे .

लातूरचा जळकोट तालुक्यातील बेळसावंगी गावाला पाण्याचा वेढा बसलाय .संपूर्ण गाव दोन्ही बाजूंनी पुराच्या पाण्याने बेडले गेले आहे .तिरू नदीच्या प्रकल्पामधूनही पाण्याचा विसर्ग सुरू आहे . जर आणखी पाऊस पडला तर परिस्थिती बिकट होऊ शकते .या गावात साधारण ७०० ते ८०० लोकसंख्या असून सर्वांचे तातडीने स्थलांतर करणे आवश्यक बनले आहे .सध्या स्थानिक अग्निशामक विभागाच्या दोन टीम घटनास्थळी दाखल झाल्यात . उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांनी घटनास्थळी भेट दिली असून छऊक्र ,भारतीय लष्कराच्या पथकांना प्राचारण करण्यात यावे अशी मागणी केली आहे . सलग आठवडाभर जोरदार पावसाने गाठल्यानंतर काल रात्रीपासून धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र पावसाने धुमाकूळ घातला .धाराशिवचा लासोना गावच्या जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोलीची भिंत ढासळली असून शाळेला सुट्टी असल्याने मोठा अनर्थ टळला आहे .

मध्यरात्रीपासून बीड जिल्ह्याला पावसाने पुन्हा झोडपले आहे .अनेक सखल भागात पाणी शिरल्या असून बीडचे ग्रामीण पोलीस ठाणे देखील पाण्यात आहे .पोलीस ठाण्यात पाणी शिरल्यामुळे सकाळपासून कामकाज बंद आहे .माजलगावच्या बडेवाडी जिल्हा परिषद शाळेतही पावसाचे पाणी साठल्याने शाळेला तळ्याचे स्वरूप आले आहे .शाळेतील साहित्याचे देखील मोठे नुकसान झाले असून शाळांना अघोषित सुट्टी मिळाली आहे . हिंगोलीत कयाधू नदीच्या पुराचे पाणी जिनिंग कंपनीत शिरून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे .सर्व मशीन अर्ध्याहून अधिक पाण्यात आहेत .अगदी काहीच दिवसांमध्ये ही कंपनी शासनाच्या वतीने कापसाची खरेदी करणार होती .परंतु त्याआधीच पुराने शेतकऱ्यांचा कापूस उध्वस्त केला आहे .

जालना जिल्ह्यात पुढील चार तास रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे .पुढील काही तासात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

## विजय थलपतीच्या रॅलीत चेंगराचेंगरी; आतापर्यंत ३९ जणांचा मृत्यू, ७० जखमी

### मृतांमध्ये १० महिलांचा समावेश ; मृतांचा आकडा वाढण्याची भीती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तिरुअनंतपुरम : अभिनेता विजय थलपतीच्या करुर इथल्या राजकीय रॅलीत मोठी चेंगराचेंगरी झाली. काल (२७ सप्टेंबर) झालेल्या या घटनेत ३९ जणांचा मृत्यू झाला असून ७० जखमी झाले आहेत. तर काहीजण बेपत्ता झाल्याचीही माहिती आहे. मृतांमध्ये १० महिलांचा समावेश आहे मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जातेय.



मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दहा लाखांची मदत जाहीर करण्यात आलीय तर जखमींना एक लाखांची मदत दिली जाणार आहे. या अपघाताबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील दुःख व्यक्त केलं आहे. दरम्यान, गृह मंत्रालयाने आता करूर अपघाताची दखल घेतली आहे. मंत्रालयाने तामिळनाडू सरकारकडून अपघाताची परिस्थिती आणि घटनास्थळी केलेल्या बचाव आणि मदत प्रयत्नांचा तपशीलवार अहवाल मागवला आहे. राज्य सरकारला हा अहवाल लवकरच गृहमंत्रालयाला सादर करावा लागेल.

मुख्यमंत्री स्टॅलिन करुरमध्ये जाऊन आढावा घेणार आहेत. तर गृहमंत्री अमित शाह यांनी मुख्यमंत्री स्टॅलिन आणि राज्यपालांशी फोनवरुन चर्चा केलीये. तर मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समितीला तपासाचे आदेश दिले आहेत. तामिळगा वेत्री कळघम पक्षाचा प्रमुख आणि अभिनेता विजय थलपतीची करूर येथे रॅली आयोजित करण्यात आली होती. या रॅलीमध्ये हजारो नागरिकांनी गर्दी केली होती. त्यादरम्यान रॅलीत थलपतीचं भाषण सुरू असताना चेंगराचेंगरी झाली. चेंगराचेंगरीची घटना घडल्यानंतर विजय थलपतीनं त्याचं भाषण थांबवलं. दरम्यान गर्दी नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केल्याचीही माहिती आहे.

करूरमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेवरून अभिनेता विजय थलापतीने शोक व्यक्त केलाय. आपल्याला असह्य, अवर्णनीय वेदना आणि दुःख आहे, असं विजय म्हणाला. जीव गमावलेल्यांच्या कुटुंबीयांसोबत आपल्या संवेदना आहेत. रूग्णालयात उपचार घेत असलेले लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थनादेखील विजयने केली आहे.

## पीएम केअर फंडातून ५० हजार कोटींची मदत जाहीर करा : उद्धव ठाकरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुख्यमंत्री पंतप्रधान यांना भेटले ते म्हणले प्रस्ताव पाठवा मदत देऊ., तुम्हाला समोर परिस्थिती दिसत असताना प्रस्ताव पाठवा काय म्हणताय? दयावान पंतप्रधान यांच्यासोबत काय चर्चा केली. मी मुख्यमंत्र्यांना हात जोडून विनंती करतो की शेतकऱ्यांना मदत करा, असे म्हणत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस आणि नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर पत्रकार परिषद घेऊन मागणी केली आहे. तसेच, पीएम महाराष्ट्रामध्ये येत आहेत, त्यांनी पीएम केअर फंडातून ५० हजार कोटींची मदत जाहीर करावी. पीएम केअर फंड आहे ना, महाराष्ट्रातून मोठा पैसा त्याच्यात आहे. मग, पीएम कोणाची केअर करतात? असा सवालही उद्धव ठाकरेंनी विचारला.

मी नुकताच धाराशिव आणि लातूर येथे पूरग्रस्त पाहणी दौरा केला, अतिशय विदारक परिस्थिती आहे. पीकं हाताशी आलं होतं, ते पूर्ण नष्ट झालं, शेतामध्ये चिखल झाला होता, यावेळी शेतकरी आपुकलीने मला बोलले. तुम्ही जी कर्जमाफी केली तशी कर्जमाफी आता करा, असं ते शेतकरी म्हणत होते. सरकारने दिलेली आणि जाहीर केलेली मदत तुटपुंजी आहे, जमीन पीक घेण्यायोग्य करावी लागणार आहे, त्याला २ ते ३ वर्ष लागतील. त्यासाठी, १ एक्कर ला ५ लाख रुपये खर्च लागणार आहे. मेहनत आणि खर्च दोन्हीही यासाठी लागणार आहे. शेतकऱ्याच्या डोक्यावर कर्ज आहे, तो आता फेडणार कसं? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थिक करत केंद्र आणि राज्य सरकारकडे शेतकऱ्यांसाठी भरीव मदतीची मागणी केली आहे.

पूरग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मुलांची वह्या-पुस्तकं वाहून गेली आहेत, ती घ्यायची कशी? असा प्रश्न त्यांच्यासामोर आहे. गावातील ३१ वर्षाच्या मुलाने आत्महत्या केली, त्यावर कर्ज होतं २ लाखांचं. माझ्याकडे कागदं आहेत, १४ हजार कोटी रुपये मदत अजूनही शेतकऱ्यांकडे पोहोचली नाही. मुख्यमंत्री म्हणतात मला राजकारण आणायचं नाही, मुख्यमंत्री यांना विचारलं मदत कधी मिळणार? तर ते म्हणतात राजकारण करू नको, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केलं. राज्यात मार्च २०२३ पासून १३ हजार कोटींची जाहीर झालेली रक्कम शेतकऱ्याला अद्यापही मिळालेली नाही, त्यामुळे कर्जमाफी सरसकट करावी ही आमची मागणी आहे. पंजाबच्या मुख्यमंत्र्यांनी ५० हजार हेक्टरी मदत केली. त्यामुळे, जसं डबल इंजिन आणि आणखी एक इंजिन लागलं तशी मदत देखील सरकारने करावी, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्थितीवर मला दया येत आहे. कोरोना काळात उत्तर प्रदेशमध्ये कित्येक ठिकाणी चिता जळत होत्या. पण, महाराष्ट्रात आम्ही जनतेची काळजी घेतली, शिवभोजन थाळाही आम्ही देऊ केली होती. त्यामुळेच, आता सरकारने पीएम केअर फंडातून मदत करावी, अशी मागणीही उद्धव ठाकरेंनी केली. भाजपच्या आमदार-खासदारांनी सगळे पैसे पीएम केअर फंडासाठी दिले होते, त्यामुळे, देवेंद्र फडणवीसांना मुख्यमंत्री सहायता निधीवर बोलण्याचा अधिकार नाही, असेही उद्धव ठाकरेंनी म्हटले.

भाजपला प्रशासन चालवता येत नाही, आता कोरोनाचे उणे दुणे काढायचे नाही नाही काढायचे असतील तर मी चर्चा करायला तयार आहे, पण आता गरज आहे शेतकऱ्यांना मदतीची. पीएम महाराष्ट्रमध्ये येत आहेत, त्यांनी पीएम केअर फंडातून ५० हजार कोटींची मदत जाहीर करावी. पीएम केअर फंड आहे ना, महाराष्ट्रातून मोठा पैसा त्याच्यात आहेत. मग, पीएम केअर कोणाची करतात? असा सवालही ठाकरेंनी विचारला.

## मुंबईकरांनो सावधान! हवामान विभागाकडून रेड अलर्ट जारी, कोकणातही अतिवृष्टीचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुंबईकरांसाठी मोठी आणि महत्वाची बातमी समोर आली आहे. मुंबईसाठी उद्या (२८ सप्टेंबर) रोजी हवामान विभागानं रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळं मुंबईत उद्या अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात येत आहे. यासोबतच, ठाणे, रायगड आणि पालघरमध्ये देखील रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकणात सर्वत्र विजांसह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

सध्या राज्यात पुन्हा एकदा मुसळधार पावसाने थैमान घातलं आहे. विविध भागात नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. शेती पिकांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकरी भरपाई देण्याची मगणी सरकारकडे करताना दिसत आहे. आम्ही जगावं कसं असा सवाल देखील शेतकरी करत आहेत.

गेल्या दोन दिवसापासून वाशिम जिल्ह्यात बरसत असलेल्या जोरदार पावसामुळे नदी नाल्यांना पूर आला आहे. मानोरा तालुक्यातील आसोला गावालगत असलेल्या नाल्यावरील पुलावर पुराचे पाणी आल्याने तीन तासापेक्षा अधिक काळ वाहतूक ठप्प होती. सायंकाळच्या दरम्यान शाळेतील विद्यार्थी शेतकरी आणि जनावर घेऊन शेतात अडकलेल्या नागरिकांनी घरी जाण्यासाठी दोर ट्रॅक्टरला बांधून धोकादायक पद्धतीने वाहत्या पाण्यातून प्रवास केला आहे.

हिंगोली जिल्ह्यातील कयाधू नदीला पूर आल्याने पुराचे पाणी शेवाळा गावातील नागरिकांच्या घरात शिरलेले आहे. अनेक नागरिकांच्या घरांमध्ये आता तीन ते अडीच फूट इतका पाणी असल्यामुळे घरातील सर्व संसार उपयोगी साहित्याचा नुकसान झालेलं आहे संपूर्ण साहित्य पाण्यामध्ये बुडालेलं आहे.

जालना जिल्ह्यात पुढील चार तास रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे .पुढील काही तासात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे .अनावश्यक कामासाठी बाहेर पडू नका .जिल्ह्यातील नागरिकांनी काळजी घेण्याचा आवाहन जिल्हा प्रशासन करत आहे. सलग आठवडाभर जोरदार पावसाने गाठल्यानंतर काल रात्रीपासून धाराशिव जिल्ह्यात सर्वत्र पावसाने धुमाकूळ घातला .धाराशिवचा लासोना गावच्या जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोलीची भिंत ढासळली असून शाळेला सुट्टी असल्याने मोठा अनर्थ टळला आहे .

### उपमुख्यमंत्री अजित पवारांचा पूरग्रस्तांशी संवाद

### कंधार तालुक्यातील मणार धरण परिसरातील बहाद्दरपुरा, शेकापूर, घोडज येथे पूर

## पूरग्रस्तांचे संसार पुन्हा उभे करण्यासाठी सर्वस्व पणाला लावू : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर पुन्हा वाढला असून काही ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. या आपत्तीमुळे उद्ध्वस्त झालेले संसार पुन्हा उभे करण्यासाठी आम्ही सर्वस्व पणाला लावू, अशा आश्वासक शब्दांत उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना धीर दिला.

नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील मणार धरण परिसरातील बहाद्दरपुरा, शेकापूर, घोडज पूरबाधित नागरिकांशी त्यांनी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या माध्यमातून व्हिडीओ कॉलद्वारे थेट संवाद साधला.

दरम्यान, बारामतीतील माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान कंधारचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा उपमुख्यमंत्री पवार यांना व्हिडीओ कॉल आला. या कॉलदरम्यान पवार यांनी नांदेड जिल्ह्यात नेमक्या कोणत्या भागांत नागरिक अडकले आहेत, त्यांच्या सुटकेसाठी हेलिकॉप्टर किंवा आमिंची मदत घेण्याची आवश्यकता आहे का? एनडीआरएफचे पथक तातडीने पाठवावे लागेल का याबाबत सविस्तर माहिती घेतली.



या संकटाच्या काळात सरकार तुमच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. प्रशासनाला आवश्यक त्या सर्व सूचना दिल्या जातील. पूरग्रस्त आणि आपत्तीग्रस्तांना तातडीने मदत पोहोचवली जाईल.

काळजी करू नका, सरकार तुमच्या सोबत आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पूरग्रस्तांना दिलासा दिला. यानिमित्ताने पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संवेदनशीलतेचे दर्शन सर्वांना झाले.

धाराशिवमध्ये पावसाने हाहाकार माजवला आहे. धाराशिवसह मराठवाडा आणि महाराष्ट्राच्या पूरग्रस्त भागात राष्ट्रीय आपत्ती घोषित करावी. तसंच शेतकऱ्यांना एनडीआरएफमधून मदत करावी अशी मागणी धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना पत्र लिहिलं आहे. धाराशिव लोकसभा मतदारसंघासह पूरग्रस्त भागात झालेल्या नुकसानीची ओमराजेंनी शाहांना माहिती दिली. पाऊस नद्यांना आलेल्या पुरामुळे पिकांचं, शेतीच मोठे नुकसान झालं आहे. नद्यांचे पाणी गावात असल्यामुळे अनेक घराची पडझड झाली, नुकसान झालं. त्यामुळे या भागात राष्ट्रीय आपत्ती घोषित करून एनडीआरएफमधून मदत करावी अशी मागणी निंबाळकरांनी केली.

धाराशिव जिल्ह्यासह अवघा मराठवाडा पुरात बुडालेला असताना दुसरीकडे जिल्हाधिकारी नाचगाण्यात दंग झालेले दिसून आले. धाराशिवच्या जिल्हाधिकाऱ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रमातला व्हिडीओ व्हायरल झाल्यानं मोठा वाद उफाळून आला.

जिल्हाधिकारी कीर्ती पुजार आणि उपजिल्हाधिकारी शोभा जाधव नाचगाण्यात रमलेले पाहायला मिळाले. तुळजापूरच्या नवरात्रोत्सवाच्या कार्यक्रमातला डान्सचा व्हिडीओ व्हायरल झाला.

जिल्हाधिकाऱ्यांनी परिस्थितीचं गांभीर्य न जपल्याने त्यांच्यावर चहुबाजूंनी टीका होत आहे. दरम्यान, झालेल्या प्रकरणानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी एक परिपत्रक जारी करत दिलगिरी व्यक्त केली.

# श्री तुळजाभवानी आणि श्री शिवछत्रपती



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**तुळजापूर...** महाराष्ट्राचं शक्तिपीठ... बालाघाटातल्या 'यमुनाचल' डोंगरावर वसलेलं... महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकचं कुलदैवत असलेलं...

'यमुनाचल' हे 'यम्मन गुड्ड'चं बोलीत झालेलं रूप... अर्थात 'यमाईचा डोंगर' या कन्नड नावाचं अपभ्रंश रूप...

इथली श्रीतुळजाभवानी दुर्गेच्या रुपातली. अष्टभुजा महिषासुरमर्दिनी असलेली. मस्तकी शिवलिंग धारण केलेली. त्रिशूळ, बाण, शंख-चक्र, धनुष्य, पानपात्र आणि महिषासुराची शिखा हाती धरलेली. पाठीवर बाणांचा भाता असलेली...

तिचा डावा पाय भूमीवर, तर उजवा पाय महिषासुराच्या देहावर स्थिरावलेला. दोन्ही पायामध्ये महिषासुराचं शिर पडलेलं, तर त्याखाली मार्कंडेय ऋषी. तिच्या मुखाच्या उजव्या-डाव्या बाजूला चंद्र-सूर्य रेखलेले...

देहावर चक्राकार कुंडले, केयूर, अंगद, काकणे, कंठा, माला, मेखला, आणि साखळ्या. गळाभर अलंकारानं सजलेली अशी ही आदिमाया श्रीतुळजाभवानी...

तुळजापूर...

साडे तीन शक्तिपीठांपैकी एक असलेलं. अनेक राजेरजवाड्यांच्या अदम्य ऊर्जेची प्रेरणा ठरलेलं. आजच्या 'धाराशिव'मधलं...

आद्य शंकराचार्यांपासून अनेक संत पुरुषांनी पायधूळ झाडलेलं. निजामाचे सरदार करमाळ्याचे निंबाळकर यांचं कुलदैवत असलेलं. त्यांच्याच काळातलं आजचं मंदिर त्या आदिमायेचं...

मालोजीराजांपासूनचे सारे भोसले कुळवंत तिचे सश्रद्ध भक्त. शहाजीराजे तिच्या दर्शनाला आल्याची नोंद कमानवेशीजवळच्या शिलालेखात, तर 'श्रीशिवछत्रपती' ही अक्षरं तिच्या कंठातल्या हरेक सुवर्णपुतळीवर...

थोरले महाराज तर स्वत:ला तिचे भोपेच म्हणवून घेत. त्यांच्या आणि श्रीतुळजाभवानीच्या जिव्हाळ नात्याचा दाखला तर साक्षात कवींद्र परमानंद गोविंद नेवासकरांनी त्यांच्या 'शिवभारता'त नोंदवून ठेवलेला...

श्रीतुळजाभवानी...

त्या 'श्रीमंत योग्या'ला साक्षात्कार देणारी. अफझल भेटीपूर्वी थोरल्या राजांना झालेल्या श्रीतुळजाभवानी साक्षात्काराचं वर्णन जसं परमानंद गोविंद नेवासकरांच्या 'शिवभारता'त, तसंच संकर्षण सकळकळे यांच्या 'शिवकाव्या'तही. दोघंही महानुभाव शिवसमकालीन. प्रत्यक्ष त्या जाणत्या राजाच्या सहवासातले...

लौकिकापलीकडच्या उद्दिष्टाच्या पूर्तीचा ध्यास लागून राहिलेल्यांना अशा साक्षात्काराची अनुभूती येतेच येते. मग तुमचामाझा विश्वास बसो न बसो...

श्रीशिवरायांनी आयुष्यभर झगडा मांडला होता तो उदात्त... उत्तुंग अशा मूल्यांच्या संवर्धनासाठीच. म्हणून तर साक्षात श्रीतुळजाभवानी त्यांच्या हातातली विजयीनी तलवार झालेली...

श्रीतुळजाभवानी...

जागृत आदिमायेचं रुप. तिचा संचार त्या 'शिवाजीराजा'त व्हायचा अशी सह्याद्रीतल्या सश्रद्ध मावळ्यांची श्रद्धाच. उभ्या मऱ्हाष्ट्र भूमीचीही तीच भावना. त्यांच्या दरबारीचा सभासद तर सांगतो...

'अफझलखान, शाहिस्तेखान, जयसिंग आणि आग्रा दरबारच्या भेटीप्रसंगी साक्षात श्रीतुळजाभवानी देवीच राजियांच्या अंगात प्रवेश करती झाली...'

श्रीतुळजाभवानी देवीचा संचार राजियांच्या देही होत होता ही बारा मावळातल्या रयतेची ठाम समजूत. त्या भाबड्या रयतेनं आपल्या या राजाला 'श्रीविष्णूचा'च अवतार मानलेलं, तर उत्तरेतून रायगडी आलेल्या कविराज भूषणानं त्यांना 'हरीचा अवतार' मानलेलं. कविराज भूषण म्हणतो,

को दाता को रनचढौ को जगपालनहार

कबि भूषन उत्तर दियौ सिव नृप हरि अवतार...

( दाता कोण, योद्धा कोण आणि जगाचा पाल- नहार कोण ?

कवी भूषणानं उत्तर दिलं, हरीचा अवतार राजा शिवाजी )

श्रीतुळजाभवानी...

सारे भोसलेकुलोत्पन्न तिचेच परमभक्त. मालोजीराजांपासून शहाजी महाराजांपर्यंत. थोरल्या छत्रपतींची सश्रद्ध भक्तीची परंपरा तर साऱ्याच छत्रपतींनी पुढं नेली. महाराणी ताराबाईंनी तर लिहिलं, 'श्री तुकाई तुळजापूर हे मूळ पीठ. बहुत जागृत. स्वामींचे कुलदैवत. हे राज्य श्रींच्या पदाचे'. या श्रीतुळजाभवानीच्या नित्य पूजेसाठी त्यांनी आलनापूर हे गाव नेमून दिलं...

त्यांचेच पुत्र असणाऱ्या दुसऱ्या शिवछत्रपतींनी तशीच आज्ञापत्रं काढली. श्रीतुळजाभवानी होती साऱ्याच भोसले कुळीची कुलस्वामिनी. शिवछत्रपतींपासून सारेच छत्रपती तिचे भोपे. तिच्या चरणांशी नतमस्तक झालेले. पार्थ पराक्रमासाठी तिलाच कौल लावणारे...

श्रीतुळजाभवानी...

तुळजापुरीचं तिचं ठाणं होतं आदिलशाही मुलखात. थोरल्या महाराजांनी ते उभारलं स्वराज्यात... किल्ले प्रतापगडावर...

प्रतापगडीच्या त्या श्रीभवानीला सव्वा मणाचं सुवर्णछत्र अर्पण करणाऱ्या थोरल्या महाराजांनी या श्रीतुळजाभवानीच्या कंठात घातली होती १०१ सोनपुतळ्यांची माळ. हरेक पुतळीवर 'श्री जगदंबा' आणि 'राजा शिवछत्रपती' अशी कोरीव अक्षरं असलेली...

या श्रीतुळजाभवानीचं साम्राज्य तर आंध्र, कर्नाटक आणि मऱ्हाष्ट्रभर. पलीकडं पार अगदी नेपाळपर्यंत. तिच्या अस्तित्वाच्या खुणा साऱ्या मुलूखभर. मऱ्हाष्ट्र... आंध्र... कर्नाटकची तर ही कुलस्वामिनी. तिच्या पायऱ्यांवर मराठी भक्तांबरोबरच तेलुगु आणि कन्नड भक्तांचेही नामलेख...

हिचं भोपेपण स्वत: राजा शिवछत्रपतींनी स्वीकारलेलं. मोठ्या अभिमानानं मिरवलेलं. त्यांच्या गळीची कवड्यांची माळ ही त्याचीच साक्ष...

श्रीतुळजाभवानी...

श्रीशिवछत्रपतींचा श्वास असलेली. आयुष्यातल्या हरघडीला त्यांना होती तिचीच सोबत. मरणाच्या कराल दाढेत असताना तिचंच त्यांना कवच. जीवावर बेतलेल्या हर प्रसंगाला तिच्याच चरणांशी जात ते म्हणत...

जगदंब ! उदयोस्तु जगदंब !

या मुलखावेगळ्या राजाला हरप्रसंगी विजय मिळावा म्हणून अवघा मावळप्रांत कविराज भूषणाच्या शब्दांत तिची आराधना करत होता...

जयति जयति जय आदिसकती
जय काली कपर्दनी
जय मधुकैटभ छलनि देवि जय
महिषहि मर्दनी
जय चमुंड जय चंडि चंडमुंडासुर
खंडनि
जय सुरक्ति जय रक्तबीज बिड्डाल
विहंडनि
जय जय निसुंभ सुंभह दलनि भनि
भूषन जय जय भननि
सरजा समथ्थ सिवराज कहि देहि
विजय जगजननि...

( हे आदिशक्ती, हे कालिके, हे पार्वती, हे मधुकैटभ महिषासुरमर्दिनी, हे दुर्गे, हे चंडमुंडासुरखंडिनी, हे शुंभ-निशुंभांचे निर्दालन करणाऱ्या सुरक्त-रक्तबीज आणि बिड्डाल यांचा संहार करणाऱ्या दुर्गे, तुझा जयजयकार असो. भूषण म्हणतो, हे जगज्जननी, सिंहसरजासमान शूर अशा शिवरायास विजय दे ! सदैव विजयी कर ! )

श्रीतुळजाभवानी...

कसं होतं तिच्याशी श्रीशिवछत्रपतींचं नातं ? ते होतं बिंब-प्रतिबिंबाचं... प्रकाश-सावलीचं...

ती आदिमायाच होती त्यांच्या उर्जस्वल आत्मभानाचं बळ. त्यांच्या उदात्त स्वप्नांना सत्यात उतरवणारी आदिशक्ती. त्यांच्यावर असणारी कृपेची सावली...

विरक्त होऊन लोककल्याणासाठी आयुष्य उधळून देणाऱ्या श्रीशिवछत्रपतींची ती होती मायमाउली. तिचा गोंधळ संत एकनाथांपासून संत तुकोबापर्यंत साऱ्यांनीच घातला, तसाच तो थोरल्या छत्रपतींनीही तो घातला... एकनाथ म्हणाले होते...

'सुवेळ सुदिन तुझा गोंधळ मांडला वो ।
ज्ञान वैराग्याचा वरती फुलवरा बांधिला वो ।... '

मऱ्हाट मातीतल्या हरेक घरचं मंगलकार्य तर तिच्या याच गोंधळानं पुरं होतं. शारदीय नवरात्रीत आपण पूजा बांधत असतो त्याच आदिशक्तीची. श्रीतुळजाभवानीची.... तेव्हा संबळाच्या तालावर शब्द घुमत असतात...

गोंधळाला ये आई... गोंधळाला ये !

आईच्या गोंधळाचा धागा तर भूमातेच्या उत्सवाशी जुळलेला. त्याचा उल्लेख वरंगळच्या काकतीयांचा गजसेनाप्रमुख जायन याच्या 'नृत्यरत्नावली'तही आलेला. इ. स. १२४०मध्ये तो म्हणतो, '...कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर तिसरा यानं आपल्या राजधानीत भूतमातृमहोत्सवाच्या प्रसंगी गोंधळाचा कार्यक्रम केला....' या उत्सवाचे अनेक उलेख सातव्या शतकापासूनच वाचायला मिळतात. मातेचा गोंधळ घालणारे हे गोंधळी म्हणतात... परशुराम हा आपला मूळ पुरुष. त्यानं केलेल्या पहिल्या मातृवंदनेपसून गोंधळाची परंपरा सुरू झाली. या गोंधळावेळी कानावर पडतं ते साऱ्या देवतामंडलाला आणि अवघ्या चराचराला केलं जाणारं आवाहन...

साती समिंदरा गोंधळा ये
नवलाख तारांगणा गोंधळा ये
धरतरी माते गोंधळा ये
आकाशी माता गोंधळा ये
भक्तांच्या गणा गोंधळा ये
राहिले साहिले गोंधळा ये...

आणि मग आदिमायेच्या या गोंधळाचा रंग चढत जातो. या शारदीय नवरात्रीत तुमच्याही घरी गोंधळी येतील आणि आदिमायेचा उदोकार करत असाच गोंधळ घालतील, तेव्हा त्यांच्या सुरात सूर मिसळत तुम्हीही म्हणा...

उदयोस्तु जगदंब उदयोस्तु...
आई राजा उदो उदो...

**- Dr Kavita Patil (MD) .**

# सनराइज पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज विद्यार्थ्यांच्या वतीने पूरग्रस्तांना मदतीचा हात




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी घालून दिला एक वेगळा आदर्श

तालुका पंढरपूर शेळवे येथील सनराइज पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज शेळवे च्या विद्यार्थ्यांनी समाजामध्ये एक नाविन्यपूर्ण आदर्श निर्माण करत माढा तालुक्यातील सेना नदीला आलेल्या महाभयंकर पुरामुळे बाधित झालेल्या पूरग्रस्तांना भरघोस अशी मदत केली.

प्रशालीतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सेना नदीच्या पोराचे भीषण वास्तव्य सांगितले असता. विद्यार्थ्यांमध्ये येथील आपल्याच बांधवांना मदत करण्याची भावना जागृत झाली, व त्यांनी येथील बांधवांना मदत करण्याचा मानस आपल्या शिक्षकांना बोलून दाखवला आणि मग संस्थेची संस्थापक अध्यक्ष समाधान गाजरे, संस्थापक सचिव अंकुश गाजरे, तसेच संस्थापक उपाध्यक्ष अजित लोकरे, यांनी इयत्ता वाईज विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या संसार उपयोगी साहित्य आणण्याचे आवाहन केले, सांगितलेल्या साहित्य पेक्षाही जास्त साहित्य म्हणजेच चहा पावडर साखर ,तांदूळ, मीठ, रवा, वेगळ्या प्रकारच्या डाळी व स्वयंपाकांची तेल, मसाला व उपवासाचे पदार्थ, पालेभाज्या फळभाज्या मिनरल वॉटरची बॉक्स, गव्हाटा मीठ मसाले कांदा लसूण, मिरची, तिखट, बिस्किटे पुढे, असे सर्व प्रकारचे एक लाखाहून जास्त किमतीचे साहित्य विद्यार्थ्यांनी जमा केले, हो काही दानशूर व्यक्ती ग्रामस्थ मित्रपरिवार यांनी त्यामध्ये अजून भर टाकली,

सर्व साहित्याचे वेगवेगळे असे प्रत्येकी पाच किलोचे किट तयार करण्यात आले, ३०० हून अधिक किट माडा येथील सेना नदीच्या पुराचा सर्वात जास्त फटका बसलेल्या केवळ आणि उंदरगाव या ठिकाणी मदतीसाठी पाठवण्यात आले.



# वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व शाळेस आर्थिक मदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : तालुक्यातील पालखेड येथील कै. दामोदर धोंडीबा हिरे यांचे नुकतेच निधन झाले.त्यांच्या दशक्रिया विधी कार्यक्रमाप्रसंगी कोणत्याही प्रकारचा दुखवटा न घेता तसेच अनावश्यक खर्चाला फाटा देत शिक्षणप्रेमी पुत्र मंडळ अधिकारी संतोष हिरे, कैलास हिरे,विजय हिरे यांनी आपल्या वडिलांच्या स्मृति तेवत ठेवण्यासाठी ज्ञानदानाचे पवित्र कार्य घडविणाऱ्या ज्ञानमंदिराच्या नूतन शालेय इमारतीच्या बांधकामासाठी अकरा हजार एकशे अकरा रुपयांचा धनादेश तसेच विद्यार्थ्यांसाठी वह्या,कंपास बॉक्स,पेन आदींसह शैक्षणिक साहित्य



महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित,न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड ता.निफाड विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक शेळके व माजी मुख्याध्यापक डी.एम. थेटे यांकडे सुपूर्त केले. सदर नाविन्यपूर्ण व विधायक उपक्रमाबद्दल पालखेड व पंचक्रोशीत एक वेगळा चांगला पायंडा पडला असून सर्व स्तरातून उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.

याप्रसंगी मनीषा हिरे,तृप्ती हिरे,आकाश हिरे,अमोल हिरे, मुख्याध्यापक अशोक शेळके, निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते,वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते,

> **आयुष्यात कळत-नकळत अनेकवेळा अनावश्यक खर्च होतो.अशा खर्चांबाबत सद-सद विवेकबुद्धीने विचार करावा.आमचे कुटुंब शाळा व शिक्षणासाठी सदैव मदत करण्यास कटिबद्ध असून समाजातील दानशूर व्यक्तींनीही यामध्ये सहभाग घ्यावा.**
>
> **- संतोष हिरे (मंडळ अधिकारी,सिन्नर)**

# ज्ञानेश्वर मेश्राम यांच्या विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती या सुमधुर स्वरांनी रसिकांची तृप्ती

श्रीक्षेत्र पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने प्रतिवर्षाप्रमाणे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आणि सन्मा. सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा यांचे उपस्थितीत दिनांक २३ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर सात दिवस दिग्गज कलाकारांच्या उपस्थितीत चालू असणाऱ्या नवरात्र संगीत महोत्सवाच चौथ गायन पुष्प पार्श्वगायक ज्ञानेश्वर मेश्राम यांनी गुंफल.सुरुवातीला सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर गायक ज्ञानेश्वर मेश्राम,पृथ्वीराज राऊत साहेब लेखाधिकारी मुकेश आणेचा,संजय कोकीळ यांचे शुभहस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून झाली.सुरुवातीला वारकरी बीज मंत्र जय जय राम कृष्ण हरी ने सुरुवात करत रुप पाहता लोचणी,,विठू माऊली तू माऊली जगाची,कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी,संतरचना गात देवा तुझ्या नावाच र वेड लागलं,विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती या अप्रतिम स्वरांनी रसिकांना अक्षरक्ष: वेड लावले.पंढरपूरकरांसाठी खास मेजवानीच ठरली.त्यांना तितकीच सुंदर साथसंगत निरुपण स्वामी राज भिसे तबला आदीनाथ कुटे हार्मोनियम तुषार केळकर पखवाज ओंकार घेगडे टाळ अनिल भुजबळ यांनी करत कार्यक्रमाला रंगत आणली.सुत्रसंचलन ज्ञानेश्वर दुधाणे सरांनी केले.यावेळी पंढरपूर कला रसिकांनी शेवटपर्यंत मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.पुढे २९ तारखेपर्यंत चालणाऱ्या महोत्सवास उदंड प्रतिसाद देण्याचे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती यांचे वतीने करण्यात आले. हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती कर्मचारी वर्ग अधिक परिश्रम घेत आहेत.




# स्वेरी एम.बी.ए.च्या ऋतुजा फाळके यांना सुवर्णपदक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) अंतर्गत असलेल्या एम.बी.ए. विभागामधील अंतिम वर्षातील विद्यार्थिनी ऋतुजा संजय फाळके यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत येणार्या महाविद्यालयांमध्ये एम.बी.ए. द्वितीय वर्षातील मानव संसाधन व्यवस्थापन (एच.आर.एम.) या विषयाच्या परीक्षेत विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळाल्यामुळे सुवर्णपदक देऊन गौरवण्यात आले त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**सुवर्णपदक मिळविण्याची परंपरा कायम**

विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे सुवर्ण पदकाने सन्मानित केले जाते. या स्पर्धात्मक युगात स्वेरी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा प्रत्येक वर्षी गुणवत्ता यादीत नंबर लागतो. यंदा देखील स्वेरीने ही परंपरा कायम राखली आहे. स्वेरी मध्ये एम.बी.ए. द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी ऋतुजा संजय फाळके यांनी मानव संसाधन व्यवस्थापन (एच.आर.एम.) या विषयाच्या परीक्षेत प्रथम आल्याबद्दल श्रीमती अलका काकडे यांच्या तर्फे असलेल्या 'श्री. विश्वास विनायक काकडे सुवर्णपदक' हा नामांकित पुरस्कार मिळविला. हा सन्मान ऋतुजा यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा तसेच महाविद्यालयाच्या गुणवत्तेच्या शिक्षण प्रणालीचा अदभूत प्रत्यय देणारा आहे. ऋतुजा यांच्या उल्लेखनीय यशामुळे स्वेरी महाविद्यालयाच्या एम.बी.ए. विभागाचे नाव उज्वल झाले आहे, हे मात्र निश्चित. त्यांना एम.बी.ए. विभागातील प्राध्यापकांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. ऋतुजा यांनी स्वेरीच्या वसतिगृहात राहून अभ्यास केला. रात्र अभ्यासिके बरोबरच, ग्रंथालयातील आवश्यक पुस्तके व संदर्भ ग्रंथ यामुळे अधिक अभ्यास करता आला. कॅम्पस मधील आदरयुक्त शिस्त व संस्कार याचाही ऋतुजा यांना फायदा झाला. त्यामुळे कठोर परिश्रम करून मिळविलेले हे यश इतर गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणादायी आहे. ऋतुजा फाळके यांना राज्याचे उच्च तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. यावेळी माजी राज्यपाल आचार्य देवव्रत, गोवा शिक्षण परिषदेचे डॉ. गोप्साल मुगेराया, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्रभारी कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ.




सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, एम.बी.ए. विभागप्रमुख डॉ. मिनल भोरे, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी ऋतुजा फाळके यांचे अभिनंदन केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# अखेर शनिशिंगणापूरचे विश्वस्त मंडळ बरखास्त

## आर्थिक व दानपेटी गैरव्यवहारांनंतर कारवाई; लवकरच सरकारकडून विश्वस्त मंडळाची नियुक्ती केली जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अहिल्यानगर/प्रतिनिधी

बरखास्त करण्यात आलं आहे. यावर प्रशासक म्हणून अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून अहिल्यानगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर देवस्थ-ानमध्ये विविध प्रकारचे गैरव्यवहार झाल्याचे समोर येत होतं. ज्यामध्ये प बनावट प्रकरण, बोगस कर्मचारी भरती घोटाळा त्याचबरोबर आर्थिक गैरव्यवहार त्यातून झालेल्या अधिकाऱ्यांच्या आत्महत्या मात्र आता शनिशिंगणापूरचं विश्वस्त मंडळ अखेर बरखास्त करण्यात आलं आहे.या देवस्थानासाठी आता प्रशासक म्हणून अहिल्यानगरच्या जिल्हाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिर्डीप्रमाणेच हे देवस्थान देखील आता सरकारच्या अख्तरित आला आहे. २०१८ मध्ये करण्यात आलेल्या कायद्याचं कायदा आजपासून लागू करण्यात आला आहे. दरम्यान यावर आता लवकरच सरकारकडून विश्वस्त मंडळाची नियुक्ती केली जाणार असल्याचा शासन निर्णय देखील जारी करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पावसाळी अधिवेशनातच याबाबत घोषणा केली होती.या शासन निर्णयामध्ये काय म्हटलं आहे?

श्री शनैश्वर देवस्थान, शिंगणापूर, जिल्हा अहिल्यानगर हे राज्यातील एक अत्यंत प्रसिद्ध व ऐतिहासिक देवस्थान असून दरवर्षी लाखो भाविक येथे श्रध्देने दर्शनासाठी येत असतात. भाविकांच्या धार्मिक श्रद्धा, भावभावना आणि जनहिताच्या दृष्टीने या देवस्थानचे प्रशासन सुयोग्य, पारदर्शक, सुसूत्र व उत्तरदायित्वपूर्ण असणे अत्यंत आवश्यक आहे.महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमान्वये, शिंगणापूर, जिल्हा अहिल्यानगर येथील 'श्री शनैश्वर देवस्थान या नावाने नोंदणी झालेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करणे, तसेच शिंगणापूर येथील श्री शनैश्वर मंदिर या देवस्थानचे सुयोग्य, पारदर्शक व उत्तरदायित्वपूर्ण प्रशासन सुनिश्चित करणे आणि त्या विश्वस्तव्यवस्थेवर राज्य शासनामार्फत आवश्यक नियंत्रण ठेवणे, तसेच त्यास अनुषंगिक व संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याच्या उद्देशाने श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ हा अधिनियम दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेला आहे.

सदर अधिनियम दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ पासून अंमलात आ-लेला आहे. उक्त अधिनियमातील कलम ५ च्या उपकलम (१) अन्वये, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन करण्याच्या प्रयोजनार्थ, शासनाकडून श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती या नावाने संबोधली जाणारी एक समिती स्थापन करण्याची तरतूद आहे.

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाच्या व्यवस्थापनाखाली असताना, देवस्थानच्या प्रशास-नात विविध प्रकारच्या अनियमितता, बनावट ॲप्स संदर्भातील घोटाळा, आर्थिक गैरव्यवहार व भ्रष्टाचार, देवस्थानातील हिंदू व मुस्लिम धर्मीय कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली वैमनस्यपूर्ण परिस्थिती, श्री शनिदेवाचे चौथऱ्यावरुन वाद, यावरुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे, तसेच देवस्थानचे उप कार्यकारी अधिकारी यांच्या आत्महत्येसारख्या अत्यंत गंभीर घटना शासनाच्या निर्दर्शनास आलेल्या आहेत.

अशा गंभीर बाबींमुळे देवस्थानच्या कार्यप्रणालीबाबत सर्वसामान्य भाविकांमध्ये अस्वस्थता व तीव्र रोष निर्माण होऊन, देवस्थ-ानावरील त्यांचा विश्वास डळमळीत झालेला आहे. त्यामुळे, भाविकांचा विश्वास अबाधित राखण्यासाठी, देवस्थानच्या प्रशासनात सुसूत्रता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने सदर अधिनियमाची अंमलबजावणी करणे आवश्यक होते. त्यासाठी श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ दि. २२.०९.२०२५ रोजी पा-सून लागू करण्यात आला आहे. सदर अधिनियम अंमलात आलेला असला तरी, अधिनियमातील कलम ५ च्या उपकलम (१) अन्वये स्थापन करण्यात येणारी श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती गठीत करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

सदर समिती गठीत होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे सदर समिती गठीत होईपर्यंत देवस्थानचा कारभार सुरळीत, शिस्तबद्ध व पारदर्शकपणे चालविणे, तसेच भाविकांना आवश्यक सेवा सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने, देवस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या व्यवस्थापनासाठी अंतरिम स्वरूपात प्रशासक नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय

श्री शनैश्वर देवस्थ-ान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ मधील कलम ५ च्या उपकलम (१) अन्वये, श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती या नावाने संबोधली जाण-ारी समिती गठीत होईपर्यंत, सदर देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार सुरळीत, सुसूत्र, पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने चालविला जावा, तसेच देवस्थानच्या दैनंदिन व्यवहाराचे व्यवस्थापन विनाविघ्न पार पाडले जावे, याकरिता जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांची प्रशासक म्हणून तात्पुरती नियुक्ती करण्यात येत आहे.

त्यांनी सदर देवस्थान विश्वस्तव्यवस्थेचे संपूर्ण प्रशासन, व्यवहार, वित्तीय बाबी, संपत्तीचे संरक्षण, तसेच भक्तांसाठीच्या सर्व सेवा-सुविधा यांचे व्यवस्थापन जबाबदारीपूर्वक पार पाडावे. ही नियुक्ती वर नमूद व्यवस्थापन समिती विधिपूर्वक गठीत होईपर्यंत किंवा शासनाचे पुढील आदेश येईपर्यंत, यापैकी जे आधी होईल तोपर्यंत लागू राहील. व्यवस्थापन समिती गठीत झाल्यानंतर, या प्रशासकाची नियुक्ती आपोआप समाप्त होईल आणि त्यांनी देवस्थानचा कारभार तात्काळ समितीकडे सुपूर्द करणे आवश्यक राहील.

---

नवरात्र महोत्सव : सहावी माळ

## श्री विठ्ठलास अलंकार, रूक्मिणी मातेस पारंपारिक कमलादेवी पोषाखासह अलंकार परिधान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे सहाव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस कमलादेवी पोषाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

श्री विठ्ठलास सोन्याचे मुकुट, नाम निळाचा, कौस्तुभ मणी, हिऱ्याचा कंगन जोड, मोत्याची कंठी दोन पदरी, शिरपेच मोठा मस्त्य जोड, पदकासह लॉकेट, अष्टपैलू मण्याची कंठी, तोडे जोड, एकदाणी, सूर्यकळ्याचा हार, तांदल्या हार ७ पदरी, पट्टीसह लॉकेट, तुळशीची माल १ पदरी, दंड्पेठ्या जोड मोठा इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच ❊रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, हिऱ्याची नथ, मोत्याचे मंगळसूत्र, मोत्याचा कंगन मोठा, चिंचपेटी हिरवी, मस्त्य जोड, चंद्र, पैजनजोड, कर्णफुले जोड, रूळ जोड, तानवड जोड, मण्यां मोत्याच्या पाटल्या, नवरत्नाचा हार,खड्याची वेणी, सोनाचे बाजूबंद पाचूची गरसोळी, पेट्याची बिंदी, बाजीराव गरसोळी, ठुशी, तारामंडळ इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच राधिका मातेस मोत्याचा कंठा, जवेची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, व सत्यभामादेवीला जवेची माळ, चिंचपेठी तांबडी, जवमानी पदक, लक्ष्मीहार मोहरांची माळ इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमाद-ेवी, यमाई - तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात आल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.

---

## राज्यातील ८६ हजार वीज कर्मचारी,अभियंते, अधिकारी व ४२ हजार कंत्राटी कामगार वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाच्या विरोधात संपावर जाणार


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई:-निर्मिती,पारेषण व वितरण या तिन्ही वीज कंपन्यात अनेक पद्धतीने सुरु अस-लेले खाजगीकरण, महावितरण कंपनीच्या नफ्याच्या क्षेत्रात टोरंटो अदानी व इतर खा-जगी भांडवलदारांना समांतर वीज वितरणाचा परवाना,एकतर्फी पुनर्रचना लागू करणे, वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करणे व इतर धोरणात्मक विषयावर क्रमबद्ध आंदोलनाची मा.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री यांना नोटीस देऊन गेल्या पंधरा दिवसापासून क्रमबद्ध आंदोलन महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी , अभियंते,अधिकारी कृती समितीने सुरू केलेली आहे.

जानेवारी २०२३ पासून ज्वलंत व महत्वाच्या विषयांबाबत कृती समिती सातत्याने शास-नाशी व प्रशासना सोबत पत्र व्यवहार करत आहे.दि.०४ जानेवारी २०२३ रोजी मा.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री यांनी तिन्ही वीज कंपन्यांचे व्यवस्थापन व कृती समिती यांची संयुक्त बैठक सह्याद्री अतिथी गृह,मुंबई येथे संपन्न झाली.या बैठकीमध्ये तिन्ही वीज कंपन्यांमध्ये कोणत्याही पद्धतीचे खाजगीकरण करण्यात येणार नाही. उलट या कंपन्यांच्या आर्थिक बळकटी करीता राज्य शासन रु.५० हजार कोटीचे अर्थसहाय्य करेल असे कामगार संघटना प्रतिनिधी बरोबर संयुक्त पत्रकार परिषद घेऊन जाहीर केले होते. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर कृती समितीने दि.०४ जानेवारी २०२३ रोजीचा संप स्थगित केला होता. मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचा भंग करत तिन्ही वीज कंपन्यांच्या प्रशासनाने विविध मार्गाने खाजगीकरणाची प्रक्रिया सुरू केलेली आहे.खाजगीकरण व इतर प्रलंबित विषयांवर शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि.०९ ऑक्टोबर २०२५ ला एक दिवसाचा संप करण्याचा निर्णय कृती समितीने जाहीर केला आहे.

**९ ऑक्टोबर रोजी संप; वीज कंपन्यांचे एकतर्फी खाजगीकरण व महावितरण कंपनीत होत असलेली पुनर्रचनेस सयुक्त कृती समितीचा विरोध**

महावितरण कंपनीच्या कार्यक्षेत्रात समांतर वीज वितरण परवाना देण्यास विरोध,महावितरण कंपनीचे ३२९ उपकेंद्र कंत्राटी पद्धतीने चालविण्यास देण्यास विरोध, महापारेषण कंपनीमधील रु.२०० कोटीच्या वरील प्रकल्प ढइउइ माध्यमातून भांडवलदारांना देण्यास विरोध व महा-पारेषण कंपनीचा शेअर मार्केट मध्ये IPO च्या माध्यमातून लिस्टिंग करण्यास विरोध,महानिर्मिती कंपनीचे जलविध्युत प्रकल्पाचे BOT तत्वावर खाजगीकरण करण्यास विरोध,वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी यांना राज्य शासनाने मंजूर केलेली पेन्शन योजना त्वरित लागू करणे,दि.०७ मे २०२१ चा शासन आदेश सुधारित करून मागासवर्गीयांना पूर्वलक्षी प्रभावाने पदोन्नती मध्ये आरक्षण लागू करणे तसेच सेवा जेष्ठतेनुसार खुल्या प्रवार्गातूनही पदोन्नती देणे, तिन्ही वीज कंपन्यातील वेतंगत १ ते ४ स्तरावरील संवर्गनिहाय रिक्त पदे पदोन्नती,सरळसेवा भरती व अंतर्गत भरतीद्वारे एम.एस.ई.बी.होल्डिंग कंपनीच्या मूळ इठ प्रमाणे भरणे,कंत्राटी/बह्यस्त्रोत कर्मचारी यांना नोकरीत समाविष्ट करण्याबाबत उपाययोजना करणे,महावितरण कंपनीच्या चुकीच्या पुनर्रचनेच्या (Restructuring) प्रस्तावाची अंमलबजावणी त्वरित थांबविणे इत्यादी मागण्या करीता हे आंदोलन व संप आयोजित केलेला आहे. कामगाराच्या कुठल्याही आर्थिक मागण्या या संपात नाही.महाराष्ट्रातील ३ कोटीच्या वर असलेल्या वीज ग्राहकांच्या व सामान्य जनतेच्या हिताकरीता वीज कर्मचारी संपावर जात आहे.




मा.देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री यांनी याप्रकरणी हस्तक्षेप करावा व त्रिपक्षीय चर्चेच्या माध्यमाने प्रश्न सोडवावा असा आग्रह कृती समितीने त्यांना पाठवलेल्या निवेदनाद्वारे केलेला.सरकार व प्रशासन आंदोलनाची दखल घेत नसल्यामुळे नाईलाजाने खालील प्रमाणे आंदोलनाचा निर्णय कृती समिती घ्यावा लागत आहे.

**आंदोलनाचे टप्पे :-** १) दि.२३.९.२०२५ रोजी महाराष्ट्रभर महावितरण कंपनीच्या पुनर्रचनेस संदर्भात काढलेल्या एम.पी.आर.ची व ३२९ उपकेंद्र कंत्राटदारांना चालविण्यात देणारा आद-ेश, महापारेषण कंपनी २०० कोटीच्या वर टर्नकी कॉन्टॅक्ट खाजगी ठेकेदारांना देण्याच्या निर्णयाच्या आदेशाची व जलविद्युत केंद्र खाजगीकरण करण्याच्या निर्णयाच्या आदेशाची होळी करण्यात आली.सोबतच तिन्ही वीज कंपन्यातील कर्मचारी व्यवस्थापना बरोबर विज निर्मिती व पुरवठ्यावर कोणताही परिणाम न होऊ देता व्यवस्थापनाच्या कोणत्याही बैठकीला उपस्थित न राहता असहकार करत आहे. २) दि.२४ सप्टेंबर २०२५ रोजी झोन,सर्कल, वीज निर्मिती केंद्र व विभागीय कार्यालयासमोर द्वारसभा घेऊन व्यवस्थापनाचा निषेध करण्यात आला. ३) दि.२५ सप्टेंबर २०२५ कार्यालयीन कामकाजासाठी तयार केलेले सर्व व्हाट्सअप ग्रुप कर्मचारी व अभियंते यांनी सोडले. ४) दि.२९ सप्टेंबर २०२५ रोजी कंपनीने दिलेले सिम कार्ड व्यवस्थापनाकडे जमा करणार आहे. ५) दि.१ ऑक्टोंबर २०२५ रोजी झोन कार्यालयासमोर प्रचंड धरणे आंदोलन करण्यात येईल.

६) दि.३ आक्टोंबर २०२५ झोन,मंडळ,विभाग कार्यालया समोर द्वारसभा घेऊन व्यवस्थापनाचा निषेध करण्यात येईल. ७) दि.६ ऑक्टोंबर २०२५ रोजी मुख्यअभियंता, अध-ीक्षक अभियंता,कार्यकारी अभियंता कार्यालयात ठिय्या आंदोलन. ८) दि.७ ऑक्टोंबर २०२५ रोजी झोन,मंडळ, विभागा समोर द्वारसभा घेण्यात येईल. ९) दि.९ ऑक्टोबरला २०२५ एक दिवसाचा लाक्षणिक संप व चर्चेच्या माध्यमाने तोडगा न निघाल्यास बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय कृती समिती जाहीर करेल.

शासन, ऊर्जा विभाग व तिन्ही वीज कंपन्यांचे प्रशासन न्यायिक मागण्या कडे दुर्लक्ष करत असल्यामुळे नाईलाजाने आंदोलनाचा निर्णय कृती समितीला घ्यावा लागला असल्याने आंदोलनामध्ये राज्यातील सर्व कामगार,अधिकारी,अभियंता व कंत्राटी व बाह्य स्तोत्र कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभाग होण्याचे आवाहन महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे कॉम्रेड मोहन शर्मा,कृष्णा भोयर, महाराष्ट्र वीज कामगार महासंघचे सरचिटणीस विठ्ठल भालेराव,अरुण पिवळ, सर्बोर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशनचे लक्ष्मण राठोड, संतोष खुमकर, महाराष्ट्र राज्य वीज कामगार काँग्रेस (इंटक) चे दत्तात्रय गुट्टे,महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनचे संजय घोडके,संजय मोरे, महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी विद्युत वर्कर्स युनियन चे अध्यक्ष पी.बी.उके व डी.बी. बोर्ड,तांत्रिक कामगार युनियन चे दिलीप कोरडे, प्रभाकर लहाने यांनी केले आहे.

---

## निफाड नगरपंचायत द्वारा स्वच्छता हि सेवा अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत च्या वतीने एक पाऊल स्वच्छतेकडे, एक पाऊल आरोग्याकडे! अंतर्गत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे दि.०२ ऑक्टोंबर या जयंती दिनाचे पार्श्वभूमीवर स्वच्छता पंधरवडा स्वच्छता हीच सेवा या उपक्रमा अंतर्गत आज दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ०८:०० वाजता एक दिवस, एक तास, एक साथ या उपक्रमा नुसार नागरीकांचे सहभागाने निफाड शहरातील शांती नगर चौफुली ते नाशिक रोड पुलापर्यंत तसेच शांती नगर चौफुली ते गायत्री नगर पर्यंत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. दि, १७ सप्टेंबर २०२५ ते दिनांक २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वच्छता ही सेवा एस एच एस हे अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहे, या अभियानात स्वच्छता मोहीम राबविणे तसेच नागरिकांचे समर्थन व सहभाग स्वच्छता कामगारांच्या योगदानाची ओळख स्वच्छता कर्मचाऱ्यांचे आरोग्य आणि कल्याण यांना प्राधान्य देणे अपेक्षित आहे, यावेळेस निफाड नगरपंचायत उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे यांनी स्वच्छता राखणेकामी नागरिकांना आवाहान केले , यावेळी नगरसेवक सचिन गिते देवदत्त कापसे, नंदुभाऊ कापसे, निफाड नगरपंचायत अधिकारी, कर्मचारी,छत्रक्ष व शहरा-तील वैनेतेय शाळा, न्यू इंग्लिश स्कुल, सरस्वती स्कुल व होरायझन शाळेतील विद्यार्थी व शिक्षक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच. निफाड नगर पंचायत चे मुख्याधिकारी धिरज भामरे यांनी नागरिकांनी सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवून आपले निफाड शहर स्वच्छ व सुंदर ठेवनेस प्रशासनास सहकार्य करावे. असे आवाहन केले.

---

**अक्कलकोट तहसील आपत्ती व्यवस्थापनच्या टीमने बोटीच्या मदतीने केली पिण्याच्या व्यवस्था**

**अंदेवाडीतील रुग्णांना काढले बाहेर**

# अंदेवाडी गावाला पुराच्या पाण्याचा वेढा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी

सध्या महाराष्ट्रात विदर्भ मराठवाडा सह सोलापूर जिल्हेला २६, २७, २८ व २९ या दिवशी हवामान विभागाने रेड अलर्ट जारी केले असून, अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर धरणाच्या वरच्या भागात धुवधार पाऊस पडल्याने कुरनूर धरणातून दि. २७ रोजी सकाळ पासून ३००० क्यूसेक्स व नंतर ३८०० क्यूसेक्सने विसर्ग वाढवण्यात आला असून, याच विसर्गाचा फटका अंदेवाडी ज च्या गावाकऱ्यांना बसला असून, संपूर्ण गावाला पुराच्या पाण्याचा वेढा बसला असून, गेल्या ८ दिवसापासून गावचा संपर्क तुटला होता. ८ दिवस संपर्क तुटला असताना गावात पिण्याची पाण्याचे आर ओ फिल्टर पाण्याचे मशीन स्टॅटर संपूर्ण पाण्यात असल्याने आर ओ फिल्टर चालू बंद करणे धोक्याचे ठरत असून, गाव-ात आजपर्यंत ५ दिवस शिल्लक पाणी होते ते पिण्यासाठी वापरण्यात आले पण गेल्या दोन दिवसापासून पिण्याचे पाणी संपल्याने नागरिकांनी टाहो फोडतानाचे विदारक चित्र सध्या अंदेवाडी ज मध्ये पाहवयास मिळत होते. गावात आर वो फिल्टर शिवाय दुसरे पिण्याचे पाणी नसल्याने नागरिकांची तारांबळ उडाली होती. गा-वातील नागरिकांनी तात्काळ अक्कलकोट चे तहसीलदार विनायक मगर यांना माहिती दिली त्यानंतर तात्काळ तहसीलदार साहेबांनी आपदा मित्रांच्या् मदतीने बोटीच्या साहाय्याने संपूर्ण गावाला पिण्याची पाण्याची व्यवस्था बोटीच्या साहाय्याने केली.

**अंदेवाडी ज या गावाला पुराचा फटका बसला होता. गावच्या चारी बाजूला पाण्याचा घेरा असून गावा-तील आर ओ फिल्टर पाण्याखाली गेले असल्याने गावात दुसरे पिण्याचे व्यवस्था नसल्याने तात्काळ आपदा मित्रांच्या माध्यमातून बोटीच्या साहाय्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली.**
**- विनायक मगर (तहसीलदार अक्कलकोट)**

**अक्कलकोट तहसीलदार साहेबांच्या सहकार्याने आपदा मित्रांच्या मदतीने आमच्या गावाला तात्काळ पिण्याची पाण्याची व्यवस्था केली असून, तसेच बोटीच्या साहाय्याने गावातील पेशन्ट देखील दळण वळण करण्यात आले. आजच्या या मदतीने आम्ही गावकरी समाधानी आहोत.**
**नागेश कलमणी - , ग्रा प ऑपरेट, अंदेवाडी ज**

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाल्याने गावाकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात आले. तहसीलदार विनायक मगर यांच्या मार्गदर्शनाखाली आपदा मित्र प्रविणकुमार बाबर, गोपीनाथ माने, हनुमंत सानप, रामचंद्र माने सोमनाथ आळुरे, यांचा समावेश होता. दरम्यान गावातील पोलीस पाटील श्रीशैल पाटील, ग्रामपंचायत ऑपरेटर नागेश कलमणी, महसूल सेवक हसन मुजावर, ग्रा प शिपाई प्रशांत कलमणी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## सोलापूरमध्ये अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान, भर पावसात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा पाहणी दौरा!

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ऑगस्टमधील मदत मंजूर

## सप्टेंबर महिन्याची नुकसान भरपाई लवकरच देणार : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, : सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक स्वरूपात अंदाजीत १० लाख २० हजार ९१७ एकर क्षेत्राचं नुकसान झालं आहे. तर, राज्यात ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये प्राथमिक अंदाजानुसार ३७ लाख ९१ हजार ३२१ हेक्टर म्हणजे ९४ लाख ७८ हजार ३०२ एकर क्षेत्र बाधित आहे. ऑगस्ट महिन्यातील पंचनामे पूर्ण होऊन ५९.७९ कोटींचा मदत निधी जाहीर करण्यात आला आहे. सप्टेंबर महिन्यातील पंचनामे महिन्याअखेरीस पर्यंत पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात येईल. तसेच प्राथमिक अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्याकरीता सप्टेंबर महिन्यात झालेल्या नुकसानीपोटी ३९३.७९ कोटी रुपयांच्या अपेक्षित निधीची गरज भासू शकते अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. तसेच येत्या मंत्रीमंडळ बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली नुकसानग्रस्त शेतक-यांना भरीव मदत देण्यासाठी चर्चा करु असेही म्हणाले.

गेल्या काही दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यात सुरू असलेल्या म ुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर आज राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हे सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. त्यांनी माढा तालुक्यातील उंदरगाव व मोहोळ तालुक्यातील पासलेवाडी आणि नांदगाव यासह दोन्ही तालुक्यातील आपत्तीग्रस्त भागांची पाहणी केली. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन मंत्री दत्तात्रय भरणे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील, माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील, मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू खरे, उम ेश पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांच्यासह महसूल विभाग, पाणीपुरवठा विभाग, ग्रामपंचायत विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

**कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागाची केली पाहणी!**

### सोलापूरला पुढील २ दिवस येलो अलर्ट

**सोलापूर शहर आणि जिल्ह्यासाठी हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे अतिवृष्टी होऊ शकते. सध्या सोलापूर शहर आणि जिल्ह्यात अत्यंत विदारक परिस्थिती आहे. प्रशासनाने नागरिकांना विशेष आवाहन केले असून गरज असेल तरच घराबाहेर पडावे. तसेच, नद्यांना पूर येण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी नागरिकांनी जाऊ नये, अशा सूचना दिल्या आहेत.**

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर महिन्यात सर्वत्र जास्त पाऊस पडल्याने नुकसान ही वाढलं आहे. कृषी विभाग आणि महसूल विभागाकडून पंचनाम्याचं काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं सर्व परिस्थितीवर बारकाईनं लक्ष आहे. सरकारने यावपूर्वीच २२१५ कोटींची मदत जाहीर केली आहे. पंचनामे पूर्ण होतील तशी मदत जाहीर होईल. या संकट काळात केंद्र सरकारकडून मदत मिळावी यासाठी काल केंद्रीय मंत्री अमित शहांना पत्र देखील देण्यात आलं आहे. तसंच, आज आणि उद्या हवामान विभागाने रेड अलर्ट दिल्याने पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी आणि नदीनाले, ओढे, पूल अशा ठिकाणांपासून दूर राहण्याचे आवाहन केलं.

सीना नदीची वहनक्षमता ५० हजार क्युसेकची असताना सुमारे दोन लाख क्युसेक इतकं पाणी नदी पात्रातून वाहिल्यानं सीना नदीनं पात्र सोडलं आहे. त्यामुळे थेट माढा व मोहा- ेळ तालुक्यातील गावे आणि शिवारांमध्ये पाणी शिरल्यानं प्रचंड हानी झाली आहे. पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी सोयाबीन, उडीत, तूर, ऊस, मका यांसारख्या पिकांचे नुकसान, जमिनीवर पाणी साचल्याने उभ्या पिकांची झालेली हानी, रस्ते व पायाभूत सुविधांवर झालेला परिणाम याबाबत कृषी मंत्री भरणेंना माहिती दिली. यावर गांभीर्यानं लक्ष देत मंत्री भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याचा पंचनामा करण्यात यावा. शेती, गुरं, विहिरी या सर्व गोष्टींचे पंचनामे करण्याचे आदेश दिले.

मंत्री भरणे म्हणाले की, सीना व भीमा नदीला आलेल्या महापूरानं जिल्ह्यातील १२९ गावांना पाण्यानं वेढा घातलेला आहे. ऑगस्टमध्ये ६ तर सप्टेंबरमध्ये ११ तालुक्यातील ८७७ गावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. त्यामध्ये द.सोलापूर, उ.सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस व मंगळवेढा आदी तालुक्यांचा समावेश आहे. तसेच या दोन्ही महिन्यात एकूण ४ लाख २८ हजार १०७ शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे.शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे. तसंच, कुठल्याही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवलं जाणार नाही. ते सोलापुरात नुकसाग्रस्त भागाच्या पाहणीदारम्यान बोलत होते.

मोहोळ तालुक्यातील पासलेवाडी व नांदगाव येथील पूरग्रस्त बाधितांना एमआयटी संस्थेमार्फत गृहपयोगी किट मदत म्हणून देण्यात आले होते, त्या किटचे वाटप कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते दोन्ही गावातील बाधित नागरिकांना यावेळी करण्यात आले.

# पंढरपूर शहरामध्ये अतिवृष्टीमुळे नागरिकांचे हाल; नागरी वस्ती शहर विविध विभागात पावसाचे पाणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर शहर व परिसरात पावसाची सतत धार सखलभागामध्ये पाणी साठले आहे. गेल्या दोन दिवसापा- सून सुरू असलेल्या पावसामुळे पंढरपूर शहरातील सर्वच रस्त्यावर पाणी साचलेले दिसून आले आहे आषाढी वारी पासून रस्त्यावर जागोजागी खड्डे पडलेले आहेत आणि पावसामुळे त्यात आणखी भर पडली आहे पंढरपूर शहरा- तील मेन शिवाय चौक, संभाजी चौक, येथे अनेक मोठमोठे खड्डे पडलेले आहेत या खड्ड्यातून पाणी साठल्यानंतर खड्डा कळत नसल्यामुळे छोटे-मोठे आभार झालेले आहेत तरी पाणी पाहून जाण्यासाठी केलेले ड्रेनेजच्या जाळ्या पूर्ण चेकअप झालेले आहेत त्यामुळे पाणी जाळीतून जाण्याऐवजी रस्त्यावरून साठवून राहते त्यामुळे शहरात पंढरपूर शहरात नागरिकांचे हाल होताना दिसत आहे असून अनेक नागरिक गोष्टी झोपडपट्टी भागात पावसामुळे घरात, दुकानात पाणी शिरले आहे, काल रात्रीपासून सोलापूरच्या हवामान खात्याने पावसाचा रिझल्ट जारी केला होता त्या अनुषंगाने पंढरपूर शहरात पावसाने हजेरी लावली व संपूर्ण पंढरपुराला व भोसले चौक परिसर शहरातील विविध भागातील झोपडपट्टी तसेच प्रताप नगर प्रतिमा ताई परिचारक नगर लक्ष्मी टाकळी कडे जाण- ारा मेन रोड अर्बन बँकेच्या समोर रस्त्याचे दुर्दशा झाली आहे आधी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात रहिवासांची नागरिकांचे व्यापाऱ्यांचे हाल होत आहेत तसेच ड्रेनेज मधून येणारी पाणी घाण पाणी गटारी मधून वाहण- ारी घाण पाणी रस्त्यावर साच- लेले असून आरोग्याच्या बाबतीत धोका निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. यासाठी योग्य त्या उपाययोजना करून संबंधित प्रशासन विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी योग्य ते नियोजन करावे अशी म ागणी पंढरपुरातील शहरवासीय नागरिकांतून होत आहे.

# विद्यार्थ्यांनी पुस्तकांपलीकडचे ज्ञान मिळवावे : डॉ. संजय शेलार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ महाविद्यालय रानवड येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बही:शाल शिक्षण मंडळ व ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवशीय 'डॉ. बाबासाहेब जयकर व्याख्यान माला' आयोजित करण्यात आली होती. व्याख्यानम ालेचे पहिले पुष्प प्रख्यात इतिहास संशोधक डॉ संजय शेलार यांनी गुंफले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की विद्यार्थ्यांनी पुस्तकांपलीकडेचे ज्ञान मि ळवायला हवे. 'आद्यकांतीवीर उमाजी नाईक' यांचे प्रेरणादायी आयुष्य त्यांनी विविध संदर्भ देऊन विद्यार्थ्यांसमोर ठेवले.

**काकासाहेबनगर महाविद्यालयात बाबासाहेब जयकर व्याख्यानमाला संपन्न**

व्याख्यानमाले दुसरे पुष्प अभिनेत्री डॉ. प्रतिभा जाधव यांनी 'व्यक्तिमत्त्व विकास' याविषयावर गुंफले. विद्यार्थ्यांनी आपलं व्यक्तिमत्त्व प्रभावी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. दिसण्यापेक्षा असणं फार महत्त्वाचे आहे. असे आपल्या व्याख्यानातून सांगितले. तिसरे पुष्प येवला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे यांनी 'छत्रपती संभाजी महाराज यांचे वेगळेपण' या विषयावर गुंफले.

सदर व्याख्यान उद्घाटन डॉ. संजय शेल- ार यांचे हस्ते करण्यात आले. कार्यशाळेचे प्रास्ताविक बही:शाल विभाग केंद्र कार्यवाह डॉ. प्रतिभा बाहेकर यांनी केले. सत्रसंचालन वैष्णवी कुशारे, सत्या कुशारे या विद्यार्थिनींनी केले. आभार प्रदर्शन प्रा. वेदिका महाले यांनी केले.

सदर व्याख्यानमालेला प्राचार्य डॉ. बी. एल. जाधव, प्रभारी प्राचार्य डॉ. अतुल गवारे, अंतर्गत गुणवत्ता कक्ष प्रमुख प्रा. मि लिंद पवार, डॉ. भावना पौळ, डॉ. अरुण ठोके, प्रा. शीतल जगताप, प्रा. मुक्ता मोरे, प्रा. आदी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

## भीमा नदी काठावरील नागरिकांनी सतर्कता बाळगावी : तहसीलदार सचिन लंगुटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : उजनी धरणातून आज दि २७ सप्टेंबर २०२५ रोजी सांडव्यातून ९० हजार क्यूसेक्स व विद्युत गृहातून १६०० क्यसेक्स विसर्ग असा एकूण ९१ हजार ६०० क्यूसेक्स विसर्ग भीमा नदीमध्ये राहणार असून भीमा नदीकाठी पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. सुरक्षेच्या दृष्टीने नदी काठावरील नागरिकांनी सतर्कता बाळगावी असे ,आवाहन तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

उजनी धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडल्याने भीमा नदीच्या काठी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून नदीकाठी, नदीच्या पाण्यात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी, पंढरपूर तालुक्यातील नदीकाठी असणा-या गावातील नदीपात्रालगत राहणा-या रहिवासी/नागरिकांना संबंधित ग्राम पंचायतीमार्फत, तात्काळ त्यांचे सर्व आवश्यक वस्तु-पशुधनासहीत सुरक्षित स्थळी स्थलांतरीत कराव्यात. तसेच त्यांना सुरक्षित स्थळी-आवश्यक्तेनुसार तात्पुरत्या निवारास्थळांचा शोध घेवून स्थलांतर करुन त्यांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

तसेच पंढरपूर तालुक्यातील भीमा नदीकाठी पुर परिस्थितीत कोणत्याही प्रकारची जीवीतहानी होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित विभागांनी घ्यावी असे आवाहनही तहसीलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांची ई पीक पाहणी अट रद्द करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी अमर जाधव

लातूर :-शेतकऱ्यांची ई पीक पाहणीची अट रद्द करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे निवेदनाद्वारे केली आहे.

आधीच अतिवृष्टीने अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना आता ई-पीक पाहणीची जाचक अट मारत आहे. शेतात जाण्यासाठी रस्तेच नसल्याने शेतकऱ्यांनी शेतात जाऊन ई-पीक पाहणी कशी करावी हा मोठा प्रश्न पडला आहे. काही ठिकाणी रस्तेच वाहून गेले आहेत, तर काहींना जाण्यासाठी नदी नाले ओलांडून जावे लागत आहे.

**राज्य बाजार समिती उपसभापती संतोष सोमवंशी**



बऱ्याच शेतकऱ्यांनी जीव धोक्यात घालून पिकात जाऊन केलेल्या ई-पीक पाहणीचा ओटीपीच येत नसल्याने मोठी डोकेदुखी होत आहे. ज्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी केली आहे त्यालाच अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची मदत मिळणार तसेच हमी भावाने शेती माल खरेदी करण्यासाठी ही अट असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अतिवृष्टीत मार खाल्लेला शेतकरी आता जाचक अटीत मरण पावत आहे. ३० सप्टेंबर ही पीक पाहणी करण्याची शेवटची तारीख असल्याचे प्रशासनाने सांगितले आहे. येणाऱ्या दोन-चार दिवसांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवाम ान विभाग व हवामान तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर ई-पीक पाहणी कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. त्यामुळे ही अटच रद्द करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघाचे उपसभापती तथा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांनी केली आहे

**मदतीसाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार**

**शिवसेना जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने यांनी केली अतिवृष्टी बाधित पिकांची पाहणी**

# सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी अमर जाधव

शुक्रवार दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी औसा तालुक्यातील जावळी, मुगळेवाडी, किणी नवरे, मोगरगा, खरोसा, परिसरा सह शिवारातील पिक नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला शिवसेनेचे लातूर जिल्हा प्रमुख शिव- ाजीराव माने सह शिवसेना तालुका प्रमुख तानाजी सुरवसे, युवासेना जिल्हा अधिकारी विजय कसपटे सह शिवसेना पदाधिकारी त्या त्या गावातील गावकऱ्या सहअतिवृष्टी आणि ढगफुटी सदृश्य पावसाने औसा तालुक्यातील खरीप हंगामातील शेतातील मुख्य पिक, सोयाबीन फळबाग, भाजीपाला, यांचे झालेले मोठे नुकसान, गुरे ढोर, शेती अवजारे, याचे झा- लेले नुकसान गावातील घरात पाणी शिरून घरातील अन्न धान्य गृह उपयोगी साहित्याची शंभर टक्के झालेले नुकसान याची औसा तालुक्यातील जावळी, मुगळेवाडी, मो- गरगा, किणी नवरे, खरोसा, या गावात जाऊन तेथे प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पाहणी करत औसा तहसी- लदार घनश्याम अडसूळ, कृषी उप संचालक दिवेकर साहेब, गटविकास अधिकारी आनंद मि रगणे, तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय हाके यांच्याशी त्या त्या गावातील परिस्थितीवर व तेथील अडचणीवर चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना सरसगट शेती वाहून गेलेले, शेती पिकांचे नुकसानीचे, घरात पाणी जाऊन गृह उपयोगी साहित्य, घराची पडझड झालेले शंभर टक्के नुकसानीचे पंचनामे करून वरिष्ठांना अहवाल सादर करण्याचे सांगत शेतकऱ्यांना धीर देत राज्य शासनाकडून सर्व निकष बाजूला ठेवून जास्ती जास्त मदत कशी मिळवता येईल यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करून बळीराजाला न्याय देण्यासाठी शिवसेना मुख्य नेते राज्याचे उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांकडे पाठपुरावा करू निसर्गाच्या भयानक परिस्थित जिल्ह्यातील शिवसेना आपल्या पाठीशी खंबीर उभी आहे. त्यामूळे शेतकऱ्यांनी भयभीत न होता स्थिर राहावे असे आवाहन शिवसेनेचे लातूर जिल्हा प्रमुख शिवाजीराव माने यांनी केले.

यावेळी बोलत असताना औसा तालुका प्रमुख तानाजी सुरवसे म्हणाले की सध्या संपूर्ण राज्यासह मराठवाड्यातील शेतकऱ्यांवर अस्मानी आणि सुलतानी असे दुहेरी संकट आलेले आहे.

पण शेतकऱ्यांनी घाबरून न जाता संयम ठेवावे राज्य शासन मुख्यमंत्री व दोन्ही उप मुख्यमंत्री हे राज्यातील सर्व परिस्थिवर बारीक लक्ष ठेऊन आहेत राज्याचे उप मुख्यमंत्री शिवसेना नेते एकनाथ शिंदे साहेबांनी सर्व निकष बाजूला ठेऊन राज्यातील शेतकऱ्यांना तात्काळ जास्ती जास्त मदत जाहीर केल्या प्रमाणे ला- तूर जिल्ह्यात २४४ कोटी तर औसा तालुक्यासाठी ३१कोटी ७५ लाख ८४ हजार रुपयांची तातडीची मदत राज्य शासनाने जाहीर करून शेतकऱ्यांच्या थेट खात्यावर टाकण्याचे आदेश दिले आहेत व प्रशासनाकडून सर्व अतिवृष्टी ग्रस्त भागाचे पंचनामे करून अहवाल सादर करा असा आदेश दिलेला आहे त्यामुळे शासना कडून शेतकऱ्यांना जास्ती जास्त मदत मिळून देण्यासाठी आम्ही सर्व शिवसैनिक पदाधिकारी आपल्या पाठीशी भक्कम उभे आहोत आपण घाबरून न जाता धीराने संकटाचा सामना करू असे शेतकर्यांना सांगितले.

यावेळी माजी उप सभापती दिनकर मुगळे, नरसिंग मोरे , विजयकुमार यादव, मेहराज पटेल, सतीश येरणुळे, चंद्रभान जाधव, सुनील सोनवणे, अनिल चांदुरे, दिनकर जाधव, माधव पाटील, जीवन निकम, अनिल सोनवणे, जीवन निकम, शिवाजी हंगरगे सह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.